# जनसंपर्क अधिकारी
मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१.
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट ३७६-२२ दिनांक ०७/१२/२०२२

## अवैध गावठी हातभट्टयांवर गुन्हे शाखा कक्ष- २ वसई तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखा वसई यांचेकडून संयुक्तरित्या कारवाई.

वसई पुर्व मालजीपाडा परिसरात खाडीमध्ये अवैध्दरित्या हातभटटीची दारु तयार होत असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्याने व त्यांचेवर परिणामकारक रित्या कारवाई करण्याबाबत वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त झाल्याने दिनांक ०६/१२/२०२२ रोजी गुन्हे शाखा-२ वसई युनीट तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध शाखा, वसई यांनी वेगवेगळी पथके तयार करुन तसेच खाडीमध्ये जाण्या करता खाजगी बोटीचा वापर करुन मोठया स्वरुपात धाडी टाकुन कारवाई केली असुन त्यात एकुण ६ गावठी हातभटटी दारुच्या भटटया व दारु बनविण्याचे उपयोगाची साधने, पम्प, तसेच गावठी हातभटटी दारु असे एकुण ४,८१,६६०/- रुपये किंमतीचा माल हस्तगत केला आहे. सदर कारवाईपुर्वी संशईत पसार झाल्याने अज्ञात आरोपीतांविरुध्द वालीव पोलीस ठाण्यात एकुण ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक- शाहुराज रणवरे, प्रभारी अधीकारी, गुन्हे शाखा-२ वसई युनीट, पोलीस निरीक्षक श्री संतोष चौधरी (प्रभारी अधीकारी) अ.मा.वा.प्र.शा. वसई, सपोनिरी/सुहास कांबळे, सपोनिरी/सागर शिंदे, सहाफौज/रमेश भोसले, सहा. फौज/मंगेश चव्हाण, सहा.फौज/संजय नवले, पो.हवा./०३०४९ महेश पागधरे, पो.हवा/०३०५२ चंदन मोरे, पोहवा/०६०२५ सचिन पाटील, पो.हवा./ ०५०३३ जगदीश गोवारी, पो हवा/०६१०७ रमेश आलदर, पोहवा/१२०४७ दादा आडके, पोहवा/१२०५३ सुधीर नरळे, पोना/०३०३२ प्रशांतकुमार ठाकुर, पो.कॉ./१२०९७ अमोल कोरे, तसेच पो.हवा./०५०२५ रोशन किणी, पो हवा/ ०७०५५ महेद्र शेटे, पोहवा/९९००३ राजेश पदमने, पोहवा/१०००२ श्याम शिदे, पो हवा/ ०७०६६ सुनील पागी नेम-अ.मा.वा.शा. वसई यांनी केली आहे.

